**रेग्युलर कज्जा क्रमांक ७१४/२०१२ मधील नि.२५ खालील आदेश.**

१) वादीने प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेमधील आदेश १ नियम १० व आदेश ६ नियम १७ नुसार दाखल केलेला आहे. प्रस्तूत अर्जात वादीचे असे कथन आहे की, वादींनी प्रस्तूतचा दावा प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी रेग्यु.कज्जा क्रमांक ४०/२०१२ च्याकामी कोर्टाची दिशाभूल करून मिळवलेला हुकूमनामा बेकायदेशीर असल्याचे व तो वादीच्या दावा मिळकतीतील कायदेशीर हक्क व अधिकारांवर तसेच दावा मिळकतीवर बंधंनकारक नसल्याबाबतची हक्कज्ञापनाची दाद व प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी दावा मिळकतीतील वादीच्या शांततामय कब्जेवहीवाटीस हरकत/अडथळा करुनये. दावा मिळकतीमध्ये ति-हाईतांचा हक्क निर्माण करुनये म्हणून प्रतिवादीं विरुध्द कायम मनाई ताकिदीसाठी प्रस्तूतचा दावा दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे व कैफियत दिली आहे. वादीचे असे कथन आहे की, सदरचा दावा नि.५ च्या चौकशीकरीता प्रलंबीत असताना प्रतिवादी क्रमांक १ यांनी दावा प्रलंबीत असल्याची माहीती लपवून वाद मिळकत नोंदणीकृत खरेदी दस्ताने विमलकुमार श्रीचंद बंब व श्री. केतन मधूकर मुसळे यांना नोंदणीकृत खरेदी दस्ताने विक्री केल्याचे नुकतेच समजून आले आहे. त्यामुळे वादीचे असे कथन आहे की, प्रस्तूतकामी वादीने ज्यांना वाद मिळकत विक्री केली आहे ते या दावेकामी आवश्यक पक्षकार असल्यामुळे त्यांना दावेकामी सामिल करून घेण्या विषयी व तशी दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्यासाठी वादीने प्रस्तूतचा अर्ज दिला

आहे.

२) प्रतिवादींनी नि.२८/सी कडे आपले म्हणणे दिले व अर्जातील कथनांचे जोरदार खंडण केले. प्रतिवादींचे असे कथन आहे की, दावा मिळकतीच्यामालकीशी अगर वहिवाटीशी वादीचा कोणताही हक्क हितसंबंध नाही. वादीने संभाव्य प्रतिवादींविरूध्द कोणतीही दाद मागितली नसल्यामूळे वादीचा अर्ज कायदयाने चालणेस पात्र नाही. वादीने दाव्याच्या तपशिलामध्ये कोणताही बदल मागणी केला नाही अगर खरेदीपत्राबाबत कोणतीही दाद मागितली नाही. त्यामुळे वादीचा अर्ज कायदयाने चालणेस पात्र नाही. सबब वादीचा अर्ज नामंजूर करण्याविषयी त्यांनी विनंती केली आहे.

३) वादीचा अर्ज व त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे वाचले. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूतकामी वादीने वाद मिळकतीचा प्रतिवादींनी दि.२१/१०/२०१५ रोजीचा केलेला संभाव्य प्रतिवादीं नोंदणीकृत खरेदी दस्ताची सर्टीफाईड नक्कल हजर केली आहे. त्याचे अवलोकन करता हे स्पष्टपणे दिसून येते की, तो दस्त प्रतिवादींनी वाद मिळकतीच्या विक्री संदर्भात केलेला आहे. वादींनी प्रस्तूत दावा प्रतिवादींविरूध्द दाखल केल्यानंतर वाद मिळकतीबाबत वाद न्यायालयात न्यायप्रविष्ठ असताना प्रतिवादींनी तो दस्त केल्याचे स्पष्टपणे दिसून येते. दावा अजूनही तुर्तातूर्त ताकिद अर्जाच्या युक्तीवादाकरीता नेमलेला आहे. दाव्यामध्ये अद्याप वादीचा पुरावा सुरू झालेला नाही. प्रतिवादी म्हणतो त्याप्रमाणे वादीचा वाद मिळकतीशी संबंध आहे किंवा कसे हे दाव्याच्या अंतिम निकालावेळी दोन्ही बाजूना

त्यांचा पुरावा देण्याची संधी देवूनच ठरणार आहे. प्रस्तूतचा दावा न्याय प्रतिवष्ठ असताना प्रतिवादींनी वाद मिळकत ति-हाईतास विक्री केलेली दिसून येते. वादीचा दावा पाहता त्याने प्रतिवादींनी दावा मिळकत ति-हाईतास तबदिल करूनये म्हणून मागणी केल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे सदर संभाव्य प्रतिवादींना दाव्यात सामिल करून वादी कोणतेही नवीन मागणी मागत नाहीत. वादी मागणी करतात त्याप्रमाणे दुरूस्ती मंजूर केलेस प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. प्रतिवादींना त्यांची जादा कैफियत देण्यास मुभा दिली जाणार आहे. मात्र संभाव्य प्रतिवादींना दावेकामी सामिल केले नाही तर दाव्याचा अंतिमतः गुणावगुणावर निकाल होणार नाही. सदर दुरूस्ती अन्वये अभिलेखावर येणारे संभाव्य प्रतिवादीं दावा मिळकतीशी नोंदणीकृत खरेदी दस्तान्वये संबंधीत झालेले दिसून येतात. त्यामुळे त्यांना दावेकामी प्रतिवादीं म्हणून सामिल केल्यास दाव्याचा अंतिम निवाडा होण्यास मदतच होणार आहे. माझ्या मत ते प्रस्तूतकामी आवश्यक पक्षकार आहेत सदरचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींच्या हक्कावर गदा येणार नाही. या उलट सदरचा अर्ज नामंजूर केल्यास दावा मिळकतीमध्ये नोंद खरेदी दस्ताने हक्क हितसंबंध निर्माण झालेल्या संभाव्य प्रतिवादींना दाव्यात सामिल न केल्यास वादी प्रतिवादींचे नुकसान होवून दाव्याचा अंतिमतः गुणावगुणावर निकाल होणार नाही. प्रस्तूतचा दावा हा तुर्तातूर्त मनाईचा अर्ज युक्तीवादीकरीता प्रलंबीत आहे. यामध्ये अद्याप वादींचा पुरावा सुरू झाला नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहितेमधील आदेश ६ नियम १७ व आदेश १ नियम १० प्रमाणे दाव्यामधील वाद विषयाचा निवाडा अंतिमतः करण्यासाठी

माझ्यामते सदरचा अर्ज मंजूर करने न्यायोचित होणार आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) वादींनी मागणी केल्याप्रमाणे दुरूस्ती आदेश झाल्यापासून १४ दिवसात करावी व दुरूस्त प्रत अभिलेखावार दाखल करावी.

सही.

दिनांक २९/०९/२०१७.

(वृ. दी. सुंगारे )
६वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
इचलकरंजी.

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | G.T.Kumbhar |
| Name of Court | V.D.Sungare,<br>6th Jt. Civil Judge Junior Division, Ichalkaranji. |
| Date of Dictation | 26/09/2017 |
| Order signed by P.O. on | 29/09/2017 |
| Order uploaded on | 05/10/2017 |